आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२३ मार्च २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कंपनी कायद्यात सुधारणा करणारं विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय

- सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतल्या पोलिसांच्या भूमिकेप्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन, पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे विधानपरिषद उपसभापतींचे निर्देश

- आसाम, पुदुचेरी आणि केरळ विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस

**आणि**

- मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत कार्लोस अलकराझ, एलेना रायबाकिना पराभूत

**<><><><><>**

कंपनी कायदा सुधारणा विधेयक २०२६ अधिक विचारविनिमयासाठी आणि सविस्तर विश्लेषणासाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं आहे. हे विधेयक आज लोकसभेत सादर केल्यानंतर ते या समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ठेवला. त्याला अनुमोदन मिळालं.  तत्पूर्वी हे विधेयक मांडण्याला काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक या विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विरोध केला. कंपनीनं अमलात आणायच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या तरतुदींना हे विधेयक सौम्य करत असल्याचा आरोप त्यांनी केला. या सुधारणेमुळे फक्त अधिक गुंतवणुकीला चालना मिळणार नाही तर त्यामुळे कंपनी प्रशासन सुधारेल, असं सीतारामन यांनी आरोपाला उत्तर देताना सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीअंतर्गत केरळला सुमारे ३१२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत, मात्र राज्य सरकारने हा निधी वापरलेला नाही, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना सांगितलं. एकूण मंजूर रकमेपैकी ७२ कोटी रुपये वायनाडच्या भूस्खलनग्रस्त भागातल्या आपत्ती निवारण प्रकल्पांसाठी आणि २२२ कोटींपेक्षा जास्त निधी तिरुवअनंतपुरमच्या शहरी पूर व्यवस्थापन योजनेसाठी मंजूर करण्यात आले आहेत. मात्र केरळ राज्य सरकारने हा निधी वापरून त्याचं प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच निधीचा पुढचा हप्ता दिला जाईल, असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज  सकाळी सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतल्या पोलिसांच्या भूमिकेचा मुद्दा चर्चेला आला. याप्रकरणी चौकशी करुन योग्य कारवाई करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत दिलं. तर विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी याप्रकरणी पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे आदेश दिले. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदान करण्यापासून दोन सदस्यांना पोलिसांनी रोखल्याप्रकरणी आज सकाळी कामकाज सुरू होण्यापूर्वी शिवसेनेच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं. मंत्री शंभुराज देसाई आणि आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. शिवसेनेच्या सदस्यांना निवडणूकीचा व्हिप बजावण्यासाठी आपण गेलो होतो, आपल्यासोबत दोन सदस्य होते. मात्र पोलिसांनी या सदस्यांना मतदान करण्यासाठी जाऊ दिलं नाही, तसंच आपल्याला धक्काबुक्की केली, यात*

*आपल्याला मार लागला असं शंभूराज देसाई यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही देसाई यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. असा प्रकार होणार असल्याचं समजल्यामुळं पोलीस महासंचालकांना याची कल्पना आधीच दिली होती. संबंधित सदस्यांवर गुन्हा दाखल असला तरी मतदानापासून कुणालाही वंचित ठेवता येत नाही, त्यामुळे त्यांना मतदान करू द्यावे असं आपण सांगितल्याचं शिंदे म्हणाले. तरीही त्यांना रोखण्यात आलं, हा लोकशाहीचा खून आहे असा आरोप उपमुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केला. याप्रकरणी चौकशी करुन योग्य कारवाई करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिलं.*

*विधानपरिषदेत हेमंत पाटील यांनी हा मुद्दा उपस्थित केला. शंभुराज देसाई यांनी या घटनेचं सविस्तर वर्णन केलं आणि राज्यात मंत्रीही सुरक्षित नाहीत का, असा प्रश्न उपस्थित केला. पोलीस अधिकाऱ्यांच्या निलंबनाबरोबरच, उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत या घटनेची सखोल चौकशी करावी आणि मंत्र्यांना धक्काबुक्की करणाऱ्या सुमारे 100 पोलीस कर्मचाऱ्यांनाही निलंबित करावं, अशी मागणी देसाई यांनी केली. त्यावर साताऱ्याचे पोलीस अधीक्षक आणि संबंधितांना निलंबित करण्याचे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सरकारला दिले. या निर्देशांचं तंतोतंत पालन सरकार करेल, असं आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिलं. ही घटना जिथे घडली, त्या जिल्हा परिषदेच्या इमारतीतलं CCTV फुटेज सुरक्षित राहील, हे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांनी सुनिश्चित करावं, असे निर्देशही उपसभापतींनी दिले. )*

***विधानसभेतून कौस्तुभ पटाईतसह अंकिता आपटे, विधानपरिषद मुंबई***

**<><><><>**

आसाम, पुदुचेरी आणि केरळ विधानसभा निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. उद्या अर्जांची छाननी होईल, २६ मार्च पर्यंत अर्ज मागे घेता येतील, मतदान ९ एप्रिलला होईल. मतमोजणी ४ मे रोजी होईल.

आसाम मधे सर्व १२६ मतदारसंघात एकाच टप्प्यात मतदान होणार असून सत्ताधारी भाजपा- आसाम गणपरिषद युतीसह सर्वच पक्षांच्या उमेदवारांची अर्ज भरण्यासाठी लगबग सुरु आहे. आसाम काँग्रेस प्रदेशाध्यक्ष गौरव गोगोई आज जोरहाट मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरतील. मुख्यमंत्रीपदासाठी काँग्रेसने त्यांचं नाव घोषित केलं आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा जालुकबारी मतदारसंघातून रिंगणात आहेत. पुदुचेरीमधे भाजपाने १० जागांवर तर एआयएडीएमके ने २ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेस आणि द्रमुकचं जागावाटप अद्याप जाहीर झालेलं नाही. राजकारणात पदार्पण करत असलेल्या अभिनेता विजय यांच्या **तमिळ वेत्री कळघम** पक्षाने सर्व ३० जागांवर उमेदवार दिले आहेत. केरळमधेही सर्व १४० जागांवर एकाच टप्प्यात मतदान होईल. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आज केरळात सर्व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. निवडणुकीच्या दृष्टीनं प्रशासनाच्या तयारीचा आढावा या बैठकीत घेतला जाईल.

**<><><><><>**

नवी दिल्लीतल्या लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं आज जम्मू काश्मीर मध्ये नऊ ठिकाणी छापे टाकले. कुपवाडा, बारामुल्ला तसंच श्रीनगर आणि कुलगाम इथल्या काही ठिकाणांचा यात समावेश आहे. गेल्या वर्षी १० नोव्हेंबर रोजी ऐतिहासिक लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एनआयएनं आतापर्यंत ११ आरोपींना अटक केली आहे. फरिदाबादमधल्या अल

फलाह विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या आत्मघाती बॉम्बर उमर उन नबी यानं हा स्फोट घडवून आणला होता.

**<><><><><>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीचा मार्ग मोकळा करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी शेवटचा इशारा दिला असताना इराणने प्रत्युत्तरात अमेरिकेच्या लष्करी तळांना वीजपुरवठा करणाऱ्या वीज प्रकल्पांवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे. होर्मुझमधला अडथळा दूर केला नाही तर इराणमधले उर्जा प्रकल्प नष्ट करु असा इशारा ट्रंप यांनी दिला होता. मात्र त्याला प्रत्युत्तर म्हणून इराण अमेरिकन सैन्याला वीजपुरवठा करणारे शेजारी देशातले उर्जाप्रकल्प तसंच अमेरिकन गुंतवणूक असलेले प्रकल्प आणि औद्योगिक आस्थापना नष्ट करेल यात कोणीही शंका घेऊ नये, असं इराणने अधिकृत माध्यमांद्वारे जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

दरम्यान संयुक्त अरब अमिरातीत अल शवामेख इथं इराणी क्षेपणास्त्राचा हल्ला यशस्वीपणे परतवून लावल्याचं अमिरातींच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितलं. तसंच सौदी अरेबियामधेही इराणचा एक हल्ला परतवून लावला तर एक क्षेपणास्त्र आणि एक ड्रोन निकामी केलं. अमेरिकेने इराणमधे कोम इथल्या टर्बाईन इंजिन उत्पादन प्रकल्पावर हल्ला करुन तो उद्धवस्त केल्याची छायाचित्र प्रसिद्ध केली आहेत .

**<><><><><>**

देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या स्वातंत्र्य सैनिकांना आज आदरांजली वाहण्यात येत आहे. ब्रिटिशांनी २३ मार्च १९३१ रोजी या तिघांना फासावर चढवलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज शहीद दिनानिमित्त भारतमातेच्या या महान सुपुत्रांना भावपूर्ण आदरांजली वाहिली आहे. राष्ट्रासाठी त्यांनी दिलेलं बलिदान सर्वांच्याच कायम स्मृतीत राहील, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये देखील या शूरांना आदरांजली वाहण्यात आली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी या क्रांतिकारकांच्या बलिदानाचं स्मरण करुन त्यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

महान समाजवादी नेते आणि विचारवंत डॉक्टर राम मनोहर लोहिया यांच्या जयंतीनिमित्त उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना अभिवादन केलं आहे.

**<><><><><>**

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत अव्वल मानांकित कार्लोस अल्काराझला तिसऱ्या फेरीतच पराभवाचा धक्का बसला. त्याला ३६व्या मानांकित सबास्तियन कोर्दा यानं तीन सलग सेटमधे नमवलं. महिला टेनिसमधे अरिना सबालेन्कानं तृतीय मानांकित एलेना रायबाकिनाला पराभूत केलं.

**//<><><><><>//**